पुणे जिल्हा परिषद, पुणे.
यशवंतराव चव्हाण भवन, वेलस्ली रोड, कॅम्प, पुणे - ४११ ००१.
शिक्षण विभाग (प्राथमिक)
Email- edupri.zppune@gmail.com | ssapune1@yahoo.co.in

# प्रथम मान्यता

जा.क्र.जि.प.शिक्षण/प्राथ/खाप्राशा1/48/ 1३०४ /2025 पुणे 1 दिनांक: 17/01/2025

प्रति,

अध्यक्ष/सचिव/मुख्याध्यापक,
सरस्वती भवन एज्युकेशन सोसायटी, संतनगर, सेक्टर नं. 4, सिध्देश्वर हौसिंग सोसायटी, मोशी, प्राधिकरण, पुणे -412 105
संचालित
फ्लाईग बर्डस् इंटरनॅशनल स्कूल व ज्युनिअर कॉलेज, ( 27254100325 ) गट नं. 568, व गट नं. 569, मौजे मरकळ, ता. खेड, जि. पुणे

विषय - महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा(स्थापना व विनियमन)अधिनियम 2012 अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापना करणे,तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी परवानगी देण्याबाबत..

संदर्भ - 1.शासन मान्यता पत्र क्रमांक एसएफएस-1024/प्र.क्र.448/ एसएम-2, दिनांक 09/10/2024 शालेय शिक्षण मंत्रालय, मुंबई
2.मा. शिक्षण उपसंचालक यांचेकडील जा.क्र.शिउसं/उमा-405/मान्यता/पुवि/2024/12956,दिनांक 11/12/2024
3.मुख्याध्यापक यांचेकडील प्रस्ताव दिनांक 30/12/2024
4.श्री.सुनिल गच्चे, उपशिक्षणाधिकारी, जि.प.पुणे यांचेकडील तपासणी अहवाल 16/01/2025

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये कळविण्यात येते की, आपल्या संस्थेने प्रथम मान्यता करीता प्रस्ताव सादर केला होता. त्या प्रस्तावानुसार व तपासणी अधिकारी यांनी केलेली शिफारशी नुसारआपल्या संस्थेस संदर्भ क्र .1 ते 4 नुसार खालील अटी व शर्तीवर इयत्ता 1 ली ते इयत्ता 8 वी साठी प्रथम मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | संस्थेचे नाव व पुर्ण पत्ता | मान्यता मिळालेल्या शाळेचे नाव व पुर्ण पत्ता | माध्यम | शाळेचा प्रकार नवीन शाळा/ दर्जावाढ | मान्यता वर्ग / इयत्ता | सुरु वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | सरस्वती भवन एज्युकेशन सोसायटी, संतनगर, सेक्टर नं. 4, सिध्देश्वर हौसिंग सोसायटी, मोशी, प्राधिकरण, पुणे -412 105 | फ्लाईग बर्डस् इंटरनॅशनल स्कूल व ज्युनिअर कॉलेज, ( 27254100325 ) गट नं. 568, व गट नं. 569, मौजे मरकळ, ता. खेड, जि. पुणे | इंग्रजी सीबीएसई | नवीन शाळा स्वयंअर्थसहाय्यित | इयत्ता 1 ली ते इयत्ता 8 वी | 2024-25 |

अटी व शर्ती

1. मंजूर केलेले शिक्षणाचे माध्यम, शाळेचे ठिकाण इ.मध्ये भविष्यात शासनच्या परवानगीशिवाय कोणताही बदल करता येणार नाही.
2. शाळा व्यवस्थापनाने शासनाने मंजुरी दिलेल्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा स्थापन केली असेल तर त्या शाळेची परवानगी रद्द होईल.
3. स्वयंअर्थ सहाय्यित शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भरती शासनाच्या प्रचलित नियमानुसार व विनियमानुसार करण्यात यावी.
4. परवानगी मिळाल्यापासून अठरा महिन्याच्या आत वर्ग सुरु न केल्यास सदर परवानगी रद्दबातल ठरेल.
5. परवानगी देण्यात आलेल्या वर्ग शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशाचे, कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम 2009 व महाराष्ट्र स्वयंअर्थ सहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 मधील सर्व तरतूदींचे पालन करणे बंधनकारक राहिल.
6. शाळा इमारतीच्या दर्शनी भागात सर्व जनतेच्या माहिती करिता स्वयं अर्थ सहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा , मंडळ सलग्नता क्रमांक, UDISE कोड इ. तपशील दर्शविणारा फलक लावणे बंधन कारक राहील.
7. महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 या अधिनियमाच्या अंतर्गत मान्यता दिलेल्या शाळांना भविष्यात अन्य ठिकाणी स्थलांतर करता येणार नाही.
8. शासन मान्यता पत्र क्र. एसएफएस-1024/प्र.क्र.448/ एसएम-2, दिनांक 09/10/2024 मधील सर्व अटी व शर्ती पुर्ततेच्या अधिन राहुन मान्यता देणेत येत आहे.
9. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन)अधिनियम 2012 याअधिनियमाच्या अंतर्गत परवानगी दिलेल्या शाळांना UDISE मध्ये माहिती भरताना स्वयंअर्थसहाय्यित शाळा म्हणून स्वतंत्र नोंद करणे आवश्यक राहील.
10. शासनाचे सध्या अस्तित्वात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवेळी विहीत करेल अशा नियमाची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.
11. **भविष्यात या शाळेच्या प्रथम मान्यते बाबत कोणत्याही स्वरुपाची तक्रार प्राप्त झाल्यास अथवा न्याय प्रविष्ठ प्रकरण उद्धवल्यास सदरचा प्रथम मान्यता आदेश रद्द करण्यांत येईल.**

( संजय नाईकडे )
शिक्षणाधिकारी(प्राथमिक)
पुणे जिल्हा परिषद,पुणे